TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- pro@mbmc.gov.in
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ ९८० /२०२२-२३ दि.:-२८ / ७ /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक
दैनिक/साप्ता. ---सिटी न्युज मुंबई---

--------------------------------------

--------------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि.२७ / ७ /२०२२ **रोजी** वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.
२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.
३) सदर जाहिरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.
४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.
५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.
६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकांत जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.
७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृत्तपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.
९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.
१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृत्तपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची पुर्ण खात्री करावी व त्यानंतरच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.
११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)
जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २६/०७/२०२२

## <u>मा. महासभा</u>

**मा. महासभा सुचना क्र. ०३**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ----------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०३/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा बुधवार दि. ०३/०८/२०२२ सभा सुचना क्र. ०३ विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| २० | दि. 25/01/2022 व 30/03/2022 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| २१ | महिला व बालकल्याण समिती अंतर्गत विविध योजना / प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड करणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. 03/06/2022 रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. 04, ठराव क्र. 04) |
| २२ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविण्याबाबत. |
| २३ | मिरा भाईदर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवासाची सवलत देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| २४ | मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब) उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) उप-मुख्य उद्यान अधिक्षक (गट-ब) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत. |
| २५ | लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन अनुदानातून कामे करणेबाबत. |
| २६ | उत्तन डम्पिंग ग्राऊंड प्रकल्प येथे अग्निशमन विषयक उपाययोजना करणेबाबत. |
| २७ | मा. महासभा दि. 02/09202, ठराव क्र. 42 अन्वये मिरा भाईदर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी तसेच वाहनचालक कर्मचाऱ्यांना यांच्याकरीता दर दोन वर्षांनी गणवेश पुरवठा वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणेबाबतच्या निश्चित असलेल्या DBT धोरणास कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे DBT धोरणाचा पुर्नविचार होऊन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत कपडा खरेदी करणे व गणवेशाची शिलाई दर निश्चित करुन त्यांच्या गणवेशाची शिलाई कामी निविदा / दरपत्रकाद्वारे ठेकेदाराची नेमणूक करुन शिलाई करुन गणवेश देणेबाबतचे नव्याने धोरण निश्चित करणेबाबत. |
| २८ | महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र 01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत. |
| २९ | वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता निविदा मागविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ३० | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ३१ | अपंग कल्याण योजने अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत. |

| | |
|---|---|
| ३२ | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकरीता यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणेकामी होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ३३ | भाईदर उत्तन 30 मीटर रुंदीच्या रस्त्याऐवजी 20 मीटर रुंदीचा करणे व 18 मीटर रुंदीऐवजी समांतर 30 मीटर रुंदीचा रस्ता करणे. |
| ३४ | उत्तन येथे सर्वधर्मीय स्मशानभमी, दफनभूमीसाठी जागेचे आरक्षण करणे. |
| ३५ | मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ) माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत. |
| ३६ | "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास" या योजनेअंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशिन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" एकूण 12 मशिन खरेदी करणेबाबत. |
| ३७ | मनपा क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी कंत्राटी सफाई कामगारांचा पुरवठा कामाची निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ३८ | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. |

जा.क्र. मनपा/नगरसचिव/३८०/2022-23
दि. २६/०७/2022.

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २६ जुलै २०२२

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

## नगरसचिव विभाग


जा.क्र. मनपा/सचिव/ ५८ /२०२२-२३ दिनांक :- २६/ ०७ /२०२२

जनसंपर्क विभाग
आवक क्र. ९८०
दिनांक २६/०७/२०२२

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेची सुचना प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मा. महासभेची सुचना दि. 27/07/2022 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी व सुचना प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्रांच्या दोन प्रती नगरसचिव कार्यालयाकडे देण्यात याव्यात.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका